# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उस्मानाबाद यांचे कार्यालय,
## उस्मानाबाद – 413 501.
दूरध्वनी क्रमांक **02472 224733**

---

क्रं./रोविले/२८५२/2026 | दिनांक : 10 एप्रील, 2026

## संगणक यंत्र सामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती बाबत
## निविदा सूचना

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद हे उस्मानाबाद जिल्हा न्यायालय तसेच जिल्हा न्यायालयाचे आस्थापनेखालील सर्व तालुका न्यायालयातील (उस्मानाबाद, उमरगा, तुळजापूर, लोहारा, कळंब, वाशी, भूम आणि परंडा) खाली नमूद संगणक यंत्रसामुग्रीच्या वार्षिक देखभाल/दुरूस्ती बाबतचे करारासाठी मुळ **किंमतीच्या 3 टक्के** (With GST) दरापर्यंत कमीत कमी रकमेच्या मोहोरबंद निविदा मागवित आहोत. सर्वात कमी रकमेची निविदा (L1) विचारात घेण्यात येईल.

### District and Subordinate Courts of Osmanabad Judicial District
### Number of Hardware and price.

| Sr. No. | Hardware Description | Qty. | Price (With GST) |
|---|---|---|---|
| 1 | Canon lbp 151DW Duplex Laser Network Printer | 44 | 481096 |
| 2 | Canon lbp 151DW Duplex Mono Laser Printer | 29 | 311663 |
| 3 | Canon Monochrome lbp 151DW Duplex Laser Network Printer | 5 | 44000 |
| 4 | Canon image Clas MF 271dn Printer | 4 | 89200 |
| 5 | Laser Printer Brother L2541 DW (AIO) | 9 | 235936 |
| 6 | Laser Printer Brother B2080DW | 5 | 76877 |
| 7 | Samsung M3320ND | 16 | 167840 |
| 8 | Networking Switches | 9 | 64684 |
| 9 | Kyocera Laser Printer M2040dn | 44 | 726880 |
| 10 | Kiosk Machine | 10 | 988900 |
| | | **Total** | **3187076** |

**AMC Location:** 1) Osmanabad 2) Omerga, 3) Tuljapur, 4)Lohara, 5) Kallam, 6) Washi, 7) Bhoom and 8) Paranda.

### संगणक यंत्र सामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती बाबतच्या शर्ती व अटी.

| कामाचे नांव | संगणक यंत्रसामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती करार. |
|---|---|
| कराराचा कालावधी | 1. निविदा मंजूर झाल्यानंतर करार झाल्याच्या **दिनांकापासून 12 महिन्यापर्यंत वैध राहील.**<br>2. वार्षिक देखभाल /दुरुस्ती कराराची रक्कम जीएसटीसह नमुद करण्यात यावी.<br>3. खालील नमूद अटी व शर्ती पूर्ण करणा–या व्यवसायिक / कंपनी यांनी आपल्या मोहर बंद निविदा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद या पत्यावर सादर कराव्यात.<br>4. मोहोरबंद निविदा हया **दिनांक 18 एप्रील, 2026** पर्यंत **दुपारी 2.00** वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारल्या जातील. दुपारी 2.00 वा.नंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.<br>5. लिफाफयावर **"संगणक यंत्र सामुग्री देखभाल दुरूस्ती करिता निविदा"** असे नमूद करावे. |
| तांत्रिक अटी व शर्ती | **व्यवसायिक / कंपनी यांनी खालील कागदपत्र निविदेसोबत जोडावे.**<br>1. व्यवसायिक / कंपनी यांना संगणक यंत्र सामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती बाबत कामाचा कमीत कमी 3 तीन वर्ष अनुभवाचे प्रमाणपत्र.<br>2. व्यवसायिक / कंपनी पंजीकृत / परवाना प्राप्त असत्याचे शॉप ॲक्ट नुसार परवान्याची छायांकित प्रत.<br>3. निविदा मंजूरीनंतर 10 दहा दिवसाचे आत सुरक्षा निधी जिल्हा न्यायालयात जमा करावा.<br>4. निविदा मंजूरीनंतर सुरक्षानिधी जमा केली गेली नसल्यास निविदा कोणतेही कारण न देता नामंजूर करण्यात येईल व त्यासंबंधी कोणतेही सबबी किंवा कारण ऐकूण घेतले जाणार नाही, व्यावसायिक / कंपनी यांनी सुरक्षा निधी निविदा मंजूर झालेनंतर जमा करणे बंधनकारक आहे.<br>5. तसेच ज्या व्यावसायिक / कंपनी ची निविदा मंजूर करण्यात येईल त्या व्यावसायिक / कंपनीने संगणक यंत्रसामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती करार करण्यास नकार दिल्यास सदर व्यावसायिक /कंपनीचा सुरक्षा निधी जप्त करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| 1 | सदरहू निविदा सुचनेत नमूद संगणक यंत्र सामुग्री कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांनी राखून ठेवलेले आहेत. |
| 2 | कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. |
| 3 | संगणक यंत्र सामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती करार उस्मानाबाद आणि उमरगा, तुळजापूर, लोहारा, कळंब, वाशी, भूम आणि परंडा येथील न्यायालयात स्थापित केलेल्या संगणक यंत्रसामुग्री करिता राहील. |
| 4 | व्यवसायिक / कंपनी / अभियंत्याकडे यंत्रसामुग्री दुरूस्ती बाबत तकार देवून नादुरुस्त प्रिंटर आपणाकडे दुरुस्तीसाठी आणून दिले असता सदरहू प्रिंटरची 03 दिवसांच्या आत दुरूस्ती करून दयावी लागेल. तसेच दुरुस्ती कामी लागणारे सुटे भागाचा खर्चही वार्षीक देखभालीच्या करारामध्ये मंजूर झालेल्या रकमेमध्ये अंतर्भूत असेल याची नोंद घ्यावी. (Kyocera Printer चे Drum Unit, Toner Unit बदलणे करारमध्ये समाविष्ट राहणार नाही). Kiosk Machine, Network Swtich तसेच संदर्भात तांत्रीक समस्या असल्यास आपल्या प्रतिनीधीला 24 तासांच्या आत सदरहू न्यायालयात पाठविणे बंधनकारक राहील सदर तकारीचे निवारण न केल्यास 24 तासानंतर प्रत्येक दिवसाला रूपये 300/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. |
| 5 | **निवीदा सादर करताना Kyocera Printer चे Drum Unit, Toner Unit च्या किमती कराराच्या किमितीच्या वेगळी नमूद करावी. पंरतू सदरील पार्टची किमंत ही Kyocera Printer च्या मुळ किमतीच्या 50 टक्के पेक्षा जास्त नसावी.** |
| 6 | दूरध्वनीव्दारे यंत्रसामुग्री दुरूस्ती संदर्भात तकार दिल्यास त्यांना त्यांची नोंद घ्यावी लागेल व ती त्यांना स्विकारावी लागेल. तसेच नोंदवही ठेवण आवश्यक आहे. सर्व न्यायालयाचे ठिकाणी व्यवसायिक/कंपनी यांना स्वखर्चाने जावे लागेल. |
| 7 | निविदा मंजूर झालेल्या कंपनीला 100/- रूपयाचे बॉन्ड पेपरवर निविदेत नमूद अटी व शर्ती बाबत करार करून दयावा लागेल सदरहू 100/- रूपयाचा स्टॅपपेपरचा खर्च कंपनीला सोसावा लागेल. |
| 8 | वर्षिक देखभाल / दुरूस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर निविदा मंजूर झालेल्या कंपनीला सोसावे लागेल. |
| 9 | संगणक उपकरणांची व्यापक (comprehensive) देखभाल / दुरूस्ती राहील. |
| 10 | यंत्र सामग्रीचे सुटे भाग हे स्टॅडर्ड कंपनीचेच असावे. लॅन मध्ये काही तांत्रीक बिघाड झाल्यास, लॅन कनेक्टीव्हीटी बंद पडल्यास सदरील ठिकाणी 24 तासाच्या आत जावून सेवा देणे बंधनकारक राहील. |
| 11 | देयक हे त्रैमासिक पध्दतीने त्रैमासिक संपल्यानंतर देयक सादर केल्यावर नियमानुसार अदा करण्यात येईल. देयक हे व्दिप्रतीत संपूर्ण तपशिलासह या कार्यालयास सादर करावे लागेल. |
| 12 | राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळून देयक अदा करण्यात येईल. रक्कम ही ईएफटी व्दारे अदा करण्यात येईल. |
| 13 | करारानुसार व अटीचे उल्लंघन केल्यास कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता आपला वार्षीक देखभाल / दुरूस्ती करार संपूर्णतः रदद करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांना राहतील. |
| 14 | कार्यालयीन कामकाजामध्ये तांत्रीक अडचणी येवू नयेत म्हणून (L1) किमतीच्या निवीदामध्ये स्थानीक निवीदाकारांनाच प्राधान्य देण्यात येईल याची नोंद घ्यावी. |

तरी स्थानिक व्यवसायिक / कंपनी / अभियंत्याने सदरहू कराराच्या आपल्या निविदा दिनांक १८ एप्रील, २०२६ पर्यंत दुपारी. ०२.०० पर्यंत जिल्हा न्यायालयास सादर कराव्यात. दिनांक १८ एप्रील, २०२६ रोजी सायं.०५.०० नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

दिनांक : 10 एप्रील, 2026
जिल्हा व सत्र न्यायालय,
उस्मानाबाद.

१०-४-२६

(ए.एस. आवटे)
जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश-3,उस्मानाबाद